श्री. माणिक भानुदास सत्रे, मैलकामगार जिल्हा परिषद
अहिल्यानगर यांचा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत--

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम ( उत्तर) विभाग
आदेश क्र.बांध/आस्था-३/३४० /२०२६
अहिल्यानगर दिनांक- खालील नमूद स्वाक्षरी

संदर्भः- १) श्री. माणिक भानुदास सत्रे, मैलकामगार यांचे सेवानिलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत दिनांक १७/०२/२०२६

२) मा .मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्रमांक आस्था.१/कार्या.५/२०२१ दिनांक ३/९/२०२१

३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारीजिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी दोषारोपत्र/ ज्ञापन क्रमांक .कार्या.१/ आस्था.५/ २२२१/ २०२२ दिनांक १/२/२०२२

४) सहाय्यक आयुक्त (चौकशी नाशिकविभाग नाशिक याचा चौकशी २५ जुलै २०२४

५) मा.प्रथमवर्गन्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२ राहुरी यांचे न्यायालयात फौजदार खटला क्रमांक ३२४/२०२१ दिनांक २१/१२/२०२१ रोजी दाखल करण्यात आलेला होता सदर खटला बाबत दिनांक १/१०/२०२५ रोजी निकाल

६) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वयेतर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७० व ७२ (४) (३)

ज्याअर्थी, श्री. माणिक भानुदास सत्रे, मैलकामगार, जि.प.सा.बा. उपविभाग राहुरी यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० अन्वये कलम ३५४, ३२४, ३२७, ५०४, ५०६ इत्यादी गुन्ह्यांबाबत फौजदारी गुन्हा दाखल झाल्याने तसेच ते दिनांक २१/०५/२०२१ ते २४/०५/२०२१ या कालावधीत पोलिस कोठडीत (४८ तासांपेक्षा अधिक) अभिरक्षेत असल्याने, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील नियम ३(२) अन्वये त्यांना संदर्भ क्रमांक.०२ अन्वये पदावरून तात्पुरते दूर करण्यात आले होते.

तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे आदेश क्रमांक आस्था.१/कार्या.५/२०२१ दिनांक ०३/०९/२०२१ अन्वये त्यांचे निलंबन आदेश निर्गमित करण्यात आले होते व ते दिनांक १४/०९/२०२१ रोजी बजाविण्यात आले.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक.४ अन्वये विभागीय चौकशी अहवालानुसार आरोप क्र. १ व २ हे न्यायप्रविष्ट असल्याचे नमूद करण्यात आले असून अंतिम न्यायनिर्णयानुसार ते निर्दोष मुक्त झालेले आहेत.

ज्याअर्थी, संबंधित प्रकरणात संदर्भ क्रमांक.०५ अन्वये मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२ राहुरी यांनी नियमित फौजदारी खटला क्र. ३२४/२०२१ मध्ये दिनांक ०१/१०/२०२५ रोजी दिलेल्या निकालान्वये श्री. माणिक भानुदास सत्रे यांना भारतीय दंड संहिता, १८६० अंतर्गत सर्व आरोपांतून निर्दोष मुक्त केले आहे.

ज्याअर्थी श्री. माणिक भानुदास सत्रे, मैलकामगार यांच्या विनंती अर्ज नुसार त्यांचा सेवा निलंबन कालावधी दि-१४/९/२०२१ ते १/१/२०२४ हा कालावधी नियमित होणे बाबतचा अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन , बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने ) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम २ नुसार सेवा निलंबन कालावधी सर्व कारणांसाठी सेवा कालावधी धरणे समर्थनीय आहे.

ज्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ ( पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन , बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने ) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम २ च्या तरतूदीस अधिन राहून श्री. माणिक भानुदास सत्रे, मैलकामगार जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा दिनांक १४/९/२०२१ ते १/१/२०२४ याकालावधील ८३८ दिवस (दोन वर्ष १०८ दिवस ) सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ सेवा कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. माणिक भानुदास सत्रे, मैलकामगार जि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा यांचे मूळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व पुढील कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र.( 20260428130023 ) असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 26-04-2026 15:31:06
(आनंद भंडारी,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री. माणिक भानुदास सत्रे, मैलकामगार जि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा तालुका श्रीगोंदा
व्दारा- उप अभियंताजि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा
प्रत- उपअभियंता, जि.प.सा.बां. श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
२/- सदरचा आदेश संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत व सेवा पुस्तकात सदर आदेशाची नोंद घेतलेल्या पानाची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.
प्रत- गटविकास अधिकारी , पंचायत समिती श्रीगोंदा/ राहुरी
प्रत- मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य ) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी स.सादर
प्रत- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बां.दक्षिण विभाग अहिल्यानगर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी